मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# पदोन्नत्यांचा धडाका; महापालिकेत अधिकाऱ्यांच्या बदल्याही!

## अभियंता, लेखापाल, आरोग्य व नर्सिंग विभागातील कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदोन्नत्या करण्यात आल्या आहेत. कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, लेखापाल, कार्यालय अधीक्षक, सहाय्यक आरोग्य अधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक, सिस्टर इनचार्ज, मेट्रन, नर्स मिडवाईफ, आरेखक, सांख्यिकी अधिकारी, विद्युत पर्यवेक्षक आणि फिटर अशा विविध पदांवर सेवाज्येष्ठतेनुसार कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच काही अधिकाऱ्यांच्या विभागांतर्गत बदल्याही करण्यात आल्या असून, या सर्व निर्णयांना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी अंतिम मान्यता दिली आहे.**



स्थापत्य विभागातील दीपक करपे, किरण अंदुरे, मनोज बोरसे, शेखर गुरव आणि चंद्रकांत मोरे या पाच उपअभियंत्यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. तर संजय लोखंडे, अनिल गडदे, विवेक ताकवाले, अमोल उंडे, तानाजी ढेकळे, संदीप ठोकळे, सचिन मगर, श्रीनिवास कोरेवार, प्रतीक भसारकर आणि चेतन देसले या दहा कनिष्ठ अभियंत्यांना उपअभियंता पदावर पदोन्नती मिळाली आहे.

लेखा विभागात शुभांगी चव्हाण, विनोद झुंझुरके, प्रियांका रणसिंग, अश्विनी निगडे, रोजश सोलंकी, पल्लवी कुलकर्णी, संदीप पवार आणि गणेश कोमकर यांना लेखापालपदी पदोन्नती देण्यात आली. तसेच विष्णू त्रिकोणे, रोहिदास शेटे, देवीदास कुंभार, रवींद्र शिंदे, प्रमिला गायकवाड, नीता राणे, राकेश सौदे, विशाल भोईर, शिवाजी खेडकर, नंदा ढेंगळे आणि उमेश बांदल यांची कार्यालय अधीक्षकपदी पदोन्नती करण्यात आली.

आरोग्य विभागातही मोठ्या प्रमाणावर पदोन्नत्या झाल्या आहेत. अतुल सोनवणे, योगेश फल्ले आणि कांचनकुमार इंदलकर यांची सहाय्यक आरोग्य अधिकारीपदी, तर सुशील मलैय आणि अमित पिसे यांची मुख्य आरोग्य निरीक्षकपदी पदोन्नती झाली आहे. एएनएम सियोना बनसोडे यांना नर्स मिडवाईफ पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

नर्सिंग विभागातील रजनी भुजबळ, राजश्री मखामले, प्रतिभा टाकळकर, अंजली तेलगू, कल्याणी जगदाळे, हेमतला शेवकर, माधुरी जिड्डीमनी, कविता जाधव, स्नेहा परब, माधुरी पंदारे, विद्या खलाटे, उज्वला कोंद्रे, वनीता गावडे आणि भारती मानमोडे या १४ स्टाफ नर्सना सिस्टर इनचार्जपदी पदोन्नती देण्यात आली आहे. सुरेखा कापरे यांची मेट्रनपदी पदोन्नती करण्यात आली.

विद्युत विभागात लक्ष्मण इटकर आणि राघवेंद्र धर्मकांबळे यांना कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती देण्यात आली. कुंदन ढोरे, नाना नरुटे, चंद्रकांत कोंढवळे, राहुल सावंत, विजय काळाणे, अमोल चव्हाण, कृष्णा पारगे, संदीप पाटील, रमेश राठोड, प्रवीण गाडेकर आणि सुनील कांबळे यांची विद्युत पर्यवेक्षकपदी पदोन्नती झाली. तर सुहास ताकवले यांची फिटर पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. पदोन्नतीने कार्यकारी अभियंता झालेल्या दीपक करपे यांच्याकडे ड क्षेत्रीय कार्यालय, किरण अंदुरे यांच्याकडे ल क्षेत्रीय कार्यालय, मनोज बोरसे यांच्याकडे स्थापत्य प्रकल्प, शेखर गुरव यांच्याकडे झोनिपू स्थापत्य आणि चंद्रकांत मोरे यांच्याकडे स्थापत्य मुख्यालयाची जबाबदारी देण्यात आली आहे.

### कार्यकारी अभियंत्यांच्या बदल्या!

पदोन्नत्यांसोबतच कार्यकारी अभियंत्यांच्या अंतर्गत बदल्यांनाही मंजुरी देण्यात आली आहे. वैशाल ननावरे यांची स्थापत्य मुख्यालयात, हरविंदरसिंग बन्सल यांची अ क्षेत्रीय कार्यालयात, विजय जाधव यांची ग क्षेत्रीय कार्यालयात, सुनील शिंदे यांची ज क्षेत्रीय कार्यालयात, तर हेमंत देसाई यांची बांधकाम परवानगी विभागात बदली करण्यात आली आहे.

# सात गावांचा कचरा नको; निखिल बोऱ्हाडेंचे आयुक्तांना निवेदन

» पिंपरी | प्रतिनिधी

**मोशी कचरा डेपोवर आणखी सात गावांचा कचरा आणण्याच्या प्रस्तावाला मोशी ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. परिसरावर आधीच कचरा व्यवस्थापनाचा मोठा भार असताना त्यात आणखी भर घालू नये, अशी मागणी नगरसेवक तथा 'क' क्षेत्रीय कार्यालयाचे सभापती निखिल बोऱ्हाडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देऊन सात गावांचा कचरा मोशी येथे आणण्याची कार्यवाही तात्काळ थांबवून पर्यायी जागा निश्चित करण्याची मागणी केली आहे.**



मोशी कचरा डेपो परिसरात यापूर्वीपासूनच शहरातील विविध भागांमधून मोठ्या प्रमाणावर कचरा आणला जातो. या परिसरात यापूर्वी गंभीर दुर्घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे डेपोची सुरक्षितता, नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरणाचा प्रश्न गंभीर बनला असताना आणखी सात गावांचा कचरा येथे आणणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका बोऱ्हाडे यांनी मांडली.

मोशी परिसरात झपाट्याने नागरीकरण होत असून लोकसंख्येतही मोठी वाढ झाली आहे. विशेष म्हणजे कचरा डेपोच्या जवळच सुमारे ८०० बेडचे रुग्णालय उभारण्यात आले आहे. त्यामुळे अतिरिक्त कचऱ्यामुळे हवा, पाणी, नदी-नाले आणि परिसरातील पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

सात गावांसाठी मोशीच्या बाहेर स्वतंत्र पर्यायी जागा निश्चित करून तेथे पर्यावरणपूरक आणि शास्त्रोक्त कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था उभारावी, अशी मागणी बोऱ्हाडे यांनी केली आहे. तसेच महापालिकेने प्रथम शहरासाठी नियोजित कचरा प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावा आणि भविष्यातील अतिरिक्त कचऱ्यासाठी स्वतंत्र नियोजन करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

> "सदर सात गावांचा अद्याप पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत अधिकृत समावेश झालेला नाही, तरी या गावांचा कचरा मोशी येथे आणण्याचा घाट कशासाठी? या गावांचा कचरा सध्या मोशी येथे आणून टाकल्यास मोशी परिसरातील नागरिकांवर अतिरिक्त भार पडणार आहे. त्यामुळे समस्त मोशी ग्रामस्थांचा याला तीव्र विरोध आहे.. भविष्यात या गावांचा महापालिका हद्दीत समावेश झाला तरी त्यांच्या कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र नियोजन करून योग्य पर्यायी व्यवस्था उभारावी."
> -निखिल बोऱ्हाडे, नगरसेवक, अध्यक्ष 'क' प्रभाग (विजयदुर्ग) क्षेत्रीय कार्यालय

### 'आंदोलनाचा इशारा'

मोशी परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा, पर्यावरणाचा आणि भविष्यातील नागरी विकासाचा विचार करून प्रशासनाने निर्णय घ्यावा. ग्रामस्थांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास नागरिकांच्या हितासाठी लोकशाही आणि कायदेशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निखिल बोऱ्हाडे यांनी दिला आहे.

# घराघरांत उजळणार स्वच्छतेचा दीप; स्वच्छतेचा संकल्प घेण्याचे आवाहन!

## घराची स्वच्छता करून दिवा प्रज्वलित करण्याचे महापौर रवि लांडगे, आयुक्त सूर्यवंशींचे आवाहन

**»» पिंपरी | प्रतिनिधी**

**केंद्र शासनाच्या ‘स्वच्छता ही सेवा – २०२६’ अभियानांतर्गत १७ सप्टेंबर रोजी प्रत्येक नागरिकाने आपल्या घराची स्वच्छता करून सायंकाळी दिवा प्रज्वलित करावा आणि स्वच्छ, निरोगी जीवनशैलीचा संकल्प करावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थी तसेच शहरातील सर्व नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.**



स्वच्छता ही केवळ सार्वजनिक ठिकाणांपुरती मर्यादित न राहता प्रत्येक घरातून आणि प्रत्येक कुटुंबातून सुरू व्हावी, या उद्देशाने हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी १७ सप्टेंबर रोजी घराची स्वच्छता करून सायंकाळी दिवा प्रज्वलित करावा. स्वच्छतेचा हा दीप आपल्या कुटुंबाच्या आरोग्याचा आणि स्वच्छ जीवनशैलीचा संकल्प अधिक दृढ करणारा ठरावा, असा महापालिकेचा उद्देश आहे.

महापौर रवि लांडगे म्हणाले, “स्वच्छ शहराची सुरुवात आपल्या घरापासून होते. प्रत्येक कुटुंबाने स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारली, तर त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण शहराच्या स्वच्छतेवर होतो. त्यामुळे नागरिकांनी १७ सप्टेंबर रोजी आपल्या घराची स्वच्छता करून दिवा प्रज्वलित करावा आणि स्वच्छतेचा संकल्प करावा. या उपक्रमात पिंपरी चिंचवडकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.”

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, “स्वच्छता ही एका दिवसाची मोहीम नसून ती सातत्याने अंगीकारायची जीवनशैली आहे. ‘स्वच्छता ही सेवा’ अभियानाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांसह शहरातील प्रत्येक नागरिकाने १७ सप्टेंबरच्या उपक्रमात सहभागी होऊन स्वच्छ, निरोगी आणि सुंदर शहराच्या निर्मितीसाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा.”

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, “घर आणि परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. नियमित स्वच्छतेच्या सवयींमुळे आरोग्यदायी वातावरण निर्माण होण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाकडे केवळ एक दिवसाचा कार्यक्रम म्हणून न पाहता स्वच्छतेची सवय कायमस्वरूपी अंगीकारावी आणि १७ सप्टेंबर रोजी आवर्जून सहभागी व्हावे.”

उप आयुक्त अण्णा बोदडे म्हणाले, “नागरिकांचा सहभाग हा स्वच्छता अभियानाचा केंद्रबिंदू आहे. प्रत्येक घरातून स्वच्छतेचा संदेश देत नागरिकांनी आपल्या घराची स्वच्छता करावी, दिवा प्रज्वलित करून स्वच्छ आणि निरोगी जीवनशैलीचा संकल्प करावा. तसेच आपल्या सहभागाची ऑनलाइन नोंद करून या अभियानाला व्यापक लोकसहभाग मिळवून द्यावा.”

नागरिकांनी १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत घराची स्वच्छता करून दिवा प्रज्वलित करावा आणि आपल्या सहभागाची ऑनलाइन नोंद करावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

‘माझे घर, माझी स्वच्छता; माझा सहभाग, माझी जबाबदारी’ या भावनेतून प्रत्येक कुटुंबाने या उपक्रमात सहभागी होऊन स्वच्छ, सुंदर पिंपरी चिंचवडच्या निर्मितीत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेने केले आहे.

### नागरिकांनी असा नोंदवावा आपला सहभाग!

उपक्रमात सहभागी झाल्यानंतर नागरिकांनी ‘स्वच्छता ही सेवा’ अभियानाच्या HTTPS://SWACHHATAHISEVA.GOV.IN/CITIZEN या संकेतस्थळावर आपल्या सहभागाची ऑनलाइन नोंद करावी. त्यासाठी ‘सहभाग प्रमाणपत्र डाउनलोड करा’ हा पर्याय निवडून नाव, वय आणि लिंग आदी आवश्यक माहिती भरावी. त्यानंतर ‘स्वच्छतेतून समृद्धीकडे’ हा उपक्रम प्रकार निवडून घराच्या स्वच्छतेनंतरचे छायाचित्र अपलोड करावे. छायाचित्र अपलोड केल्यानंतर नागरिकांना सहभागाचे प्रमाणपत्र मिळणार आहे.

# पाणी, रस्ते, स्वच्छतेसह नागरी सुविधांना गती; स्थायी समितीचे धडाकेबाज निर्णय!

**»» पिंपरी | प्रतिनिधी**

**मा. स्थायी समितीची साप्ताहिक सभेत शहराच्या विकासाशी निगडित तसेच नागरिकांच्या सोयी-सुविधांशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रस्तावांवर चर्चा करून स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी मंजुरी दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जंगम, विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर यांच्यासह समिती सदस्य तसेच पालिकेतील विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.**



स्थायी समिती बैठकीत पाणीपुरवठा, जलनिःसारण, दिव्यांग भवन, बस डेपो व चार्जिंग स्टेशन, महिला वसतिगृह, स्वच्छता, रस्ते, शाळा, पशुवैद्यकीय सेवा तसेच विविध नागरी सुविधांशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

पाणीपुरवठा विभागांतर्गत नवी सांगवी परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली.तसेच जलनिःसारण विभागांतर्गत जलनिःसारण नलिकांची आधुनिक पद्धतीने देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली.

मोरवाडी येथील सुमारे २४ हजार चौ. फूट क्षेत्रफळाच्या दिव्यांग भवनात विविध प्रकारच्या दिव्यांग नागरिकांसाठी थेरपी, समुपदेशन, फिजिओथेरपी, हायड्रोथेरपी, स्पीच थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, कौशल्य व व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, ऑडिटोरियम आणि लायब्ररी यांसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

मौजे वाकड येथील पीएमपीएमएल बस डेपो आणि कार्यालयाची इमारत विकसित करणे तसेच बसेससाठी चार्जिंग स्टेशन प्रणाली उभारण्याच्या कामासाठी आवश्यक असलेल्या उच्चदाब भूमिगत विद्युत वाहिनी आणि वीजपुरवठ्याशी संबंधित कामांना मंजुरी देण्यात आली.

प्रभाग क्र. २५, वाकड येथे कार्यरत महिलांसाठी वसतिगृह बांधण्याच्या कामांतर्गत चालू आर्थिक वर्षातील जमा व खर्च लेखाशीर्षामध्ये आवश्यक सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. स्वच्छ महाराष्ट्र भारत अभियानांतर्गत क क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत महिला बचत गटाच्या माध्यमातून शून्य कचरा (ZERO WASTE) प्रकल्प राबविण्यास मुदतवाढ व मंजुरी देण्यात आली.प्रभाग क्र. ११ मधील मनपाच्या विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे, तसेच प्रभाग क्र.२२, काळेवाडी आणि प्रभाग क्र. १८, चिंचवड येथील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून पुढील करारांना मंजुरी देण्यात आली.

शिक्षण मंडळ विभागामार्फत प्राथमिक शाळांमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेची वार्षिक तत्त्वावर देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामास मान्यता देण्यात आली.प्रभाग क्र. ०३, चऱ्होली येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या रस्त्यांवर स्ट्रीट लाईट सुरु करण्यासाठी नवीन वीजमीटर घेण्यास आणि वीजपुरवठा कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली.महापालिकेच्या विविध पशुवैद्यकीय रुग्णालयांमध्ये, ॲम्बुलन्सवर, डॉग व्हॅन आणि डॉग पार्क इत्यादी ठिकाणी आवश्यक मनुष्यबळ पुरवण्यासाठी एजन्सीची निवड करून कामाचे आदेश देण्यास मंजुरी देण्यात आली.

बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत महापालिका क्षेत्रात मूलभूत नागरी सुविधांचा विकास करण्यासाठी प्राप्त अनुदानातून शाळांमध्ये प्रयोगशाळा व वाचनालय विकसित करणे, जिम उपकरणे बसविणे आणि रुग्णालयांसाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करणे यांसारख्या भांडवली कामांचा समावेश करण्यास मंजुरी देण्यात आली.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५ मोहिमेचा भाग म्हणून शहरातील विविध प्रभागांमध्ये नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी संदेश, घोषवाक्ये आणि बोलकी चित्रे रंगविण्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली.

> “पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना अधिक सक्षम, दर्जेदार आणि वेळेत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्रमुख जबाबदारी आहे. आजच्या स्थायी समितीच्या बैठकीत पाणीपुरवठा, जलनिःसारण, दिव्यांग कल्याण, सार्वजनिक वाहतूक, महिला सुविधा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयांची प्रभावी आणि वेळेत अंमलबजावणी होऊन त्याचा थेट लाभ नागरिकांना मिळावा, यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन अशाच प्रकारे सकारात्मक आणि लोकाभिमुख निर्णय घेण्यास स्थायी समिती कटिबद्ध आहे.
>
> -अभिषेक बारणे, सभापती - स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

# रोलबॉलमध्ये AHPS चा डबल धमाका!

## मुला-मुलींच्या दोन्ही गटांत अजिंक्यपद; AHPSचा दुहेरी मुकुट

» पिंपरी | प्रतिनिधी

**जिल्हा परिषद पुणे यांच्या वतीने आयोजित १४ वर्षांखालील रोलबॉल स्पर्धेत चिखली येथील अॅकॅडमिक हाइट्स पब्लिक स्कूलने (AHPS) मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही गटांत अजिंक्यपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला. निगडी येथील यमुनानगरमधील ठाकरे मैदानावर पार पडलेल्या या चुरशीच्या स्पर्धेत AHPS च्या दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच सामन्यांवर वर्चस्व राखत हे सुवर्ण यश खेचून आणले.**



### गोलांचा वर्षाव, दुहेरी बाजी!

चिखलीतील अॅकॅडमिक हाइट्स पब्लिक स्कूलने १४ वर्षांखालील रोलबॉल स्पर्धेत मुला-मुलींच्या दोन्ही गटांत विजेतेपद पटकावत दमदार कामगिरी केली. मुलांच्या संघाला कृष्णा येवलेच्या गोलांची साथ मिळाली, तर मुलींच्या संघासाठी वीरा मोरेने सर्व पाच गोल करत विजयात मोलाची भूमिका बजावली.



मुलांच्या गटात AHPS च्या संघाने सातत्यपूर्ण आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन घडवले. प्राथमिक फेरीत पॉदार स्कूलचा १-० असा पराभव केल्यानंतर, त्यांनी माउंट लिटेरा स्कूलविरुद्ध ५-१ अशी धडाकेबाज मात केली. अत्यंत अटीतटीच्या ठरलेल्या उपांत्य फेरीत मोशी-पिंपरी परिसरातील बलाढ्य मानल्या जाणाऱ्या एसएनबीपी (SNBP) स्कूल, मोरवाडीचा ३-२ असा पराभव करत संघाने अंतिम फेरीत धडक मारली. विजेतेपदाच्या अंतिम लढतीत त्यांनी प्रतिस्पर्धी सेंट उर्सुला हायस्कूल, निगडीचा २-१ अशा फरकाने पराभव करून चॅम्पियन ट्रॉफीवर आपले नाव कोरले. या संपूर्ण मोहिमेत सर्वाधिक गोल झळकावून कृष्णा येवले मुलांच्या विजयाचा शिल्पकार ठरला, तर त्याला प्रतीक शर्माने महत्त्वपूर्ण दोन गोल करत मोलाची साथ दिली.

दुसऱ्या बाजूला, मुलींच्या संघाने एकाही गोलची परतफेड होऊ न देता संपूर्ण स्पर्धेत अभेद्य संरक्षण आणि अचूक आक्रमणाचा नमुना पेश केला. सलामीच्या लढतीत आर्मी स्कूल, देहूरोडचा १-० असा पराभव करत मुलींनी आगेकूच केली. त्यानंतर उपांत्य फेरीत एसएनबीपी स्कूल, चिखलीचा ३-० असा फडशा पाडला. अंतिम सामन्यात त्यांनी मुलांच्या संघाप्रमाणेच सेंट उर्सुला हायस्कूल, निगडीला निष्प्रभ करत २-० अशा फरकाने विजय मिळवून अजिंक्यपद पटकावले. मुलींच्या या संपूर्ण विजयाची सूत्रधार ठरली ती वीरा मोरे; तिने तिन्ही सामन्यांत नेत्रदीपक खेळ करत संघाचे सर्वच्या सर्व पाच गोल एकहाती नोंदवले आणि सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

अंतिम सामन्याच्या वेळी शाळेचे संचालक श्री. मुकेश तिलवानी यांनी मैदानावर उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवला. या ऐतिहासिक दुहेरी यशानंतर शाळेचे अध्यक्ष श्री. दिलीप तिलवानी आणि प्राचार्या सौ. स्नेहल श्रीगोंदेकर यांनी दोन्ही संघांचे खेळाडू आणि त्यांना घडवणारे प्रशिक्षक श्री. राजा प्रसाद यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. एकाच स्पर्धेत दोन्ही गटांत मिळालेल्या या दुहेरी विजयामुळे अॅकॅडमिक हाइट्स पब्लिक स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून संपूर्ण क्रीडा क्षेत्रातून संघावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# गोल्डन कारही पोलिसांच्या रडारवर; काळ्या काचा अन् फॅन्सी नंबर प्लेटवर कारवाई!

» पिंपरी | प्रतिनिधी

**वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांविरोधात पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी धडक मोहीम सुरू केली असून, या कारवाईत चर्चेत असलेल्या 'गोल्डमॅन'च्या गोल्डन कारवरही कारवाई करण्यात आली. वाहनाच्या काचांवर काळी फिल्म लावण्यात आल्याचे तसेच नियमानुसार HSRP नंबर प्लेटऐवजी फॅन्सी नंबर प्लेट वापरण्यात आल्याचे तपासणीत आढळून आले.**



### गोल्डन कारवरही कारवाईचा बडगा!

हिंजवडी वाहतूक पोलिसांच्या विशेष मोहिमेत गोल्डन रंगाच्या कारवर कारवाई करण्यात आली. काळी फिल्म आणि फॅन्सी नंबर प्लेट आढळल्याने फिल्म काढून संबंधित चालकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. नियम सर्वांसाठी समान असल्याचा संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

हिंजवडी वाहतूक विभागाकडून नियमबाह्य वाहनांवर धडक कारवाई सुरू असताना पोलिसांच्या निदर्शनास आकर्षक गोल्डन रंगाची कार आली. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता काचांवर काळी फिल्म लावण्यात आल्याचे तसेच नियमानुसार HSRP नंबर प्लेटऐवजी फॅन्सी नंबर प्लेट वापरण्यात आल्याचे आढळून आले. वाहनाच्या तपासणीनंतर पोलिसांनी तत्काळ काचांवरील काळी फिल्म काढून टाकली. तसेच संबंधित वाहनचालकाविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात हिंजवडी वाहतूक विभागाने विशेष मोहीम सुरू केली आहे. वाहनांमध्ये नियमबाह्य बदल करून रस्त्यावर फिरणाऱ्या चालकांची तपासणी केली जात असून, काळ्या काचा, फॅन्सी नंबर प्लेट तसेच इतर बेकायदेशीर बदल आढळल्यास कारवाई केली जात आहे. वाहन आकर्षक किंवा महागडे असले तरी वाहतूक नियमांमध्ये कोणतीही सवलत दिली जाणार नसल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

काळ्या काचा आणि फॅन्सी नंबर प्लेटमुळे वाहनाची ओळख व सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे वाहनचालकांनी केवळ देखावा किंवा आकर्षकपणासाठी नियमबाह्य बदल करू नयेत. अशा प्रकारच्या नियमभंगाविरोधातील कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

नागरिकांनी आपल्या वाहनांवर शासनाने निर्धारित केलेली HSRP नंबर प्लेट वापरावी, काचांवर नियमबाह्य फिल्म लावणे टाळावे आणि वाहनांमध्ये अनधिकृत बदल करू नयेत. सर्व वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून पोलिसांच्या कारवाईला सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक विभागाकडून करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवात खेड पोलिसांचा दणका; दारू-मटका धंद्यावर धाडी!

## कनेरसर, कडधे, ठाकूर पिंपरीत अवैध दारू विक्रीवर कारवाई; जुगार-मटका अड्ड्यावर छापा

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खेड पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात धडक मोहीम सुरू केली असून, बुधवारी (दि. १६) एकाच दिवशी अवैध दारू विक्रीसह मटका-जुगारावर कारवाई केली. कनेरसर, कडधे आणि ठाकूर पिंपरी येथे पोलिसांनी छापे टाकून अवैध दारू विक्री करणाऱ्या चार जणांना मुद्देमालासह ताब्यात घेतले. तर राजगुरुनगर शहरात मटका आणि जुगार अड्ड्यावरही पोलिसांनी धाड टाकली.**

खेड तालुक्यातील कनेरसर, कडधे आणि ठाकूर पिंपरी परिसरात अवैध दारू विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी या माहितीची गांभीर्याने दखल घेत गुप्त पद्धतीने तपास सुरू केला. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांनी संबंधित ठिकाणांवर सापळा रचून अचानक छापे टाकले. या कारवाईत अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला असून, दारू विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या चार जणांना मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या या अचानक कारवाईमुळे संबंधित परिसरात खळबळ उडाली.

दरम्यान, राजगुरुनगर शहरातही पोलिसांनी अवैध मटका आणि जुगाराच्या अड्ड्याविरोधात धडक कारवाई केली. शहरातील काही ठिकाणी मटका आणि जुगार सुरू असल्याच्या तक्रारी तसेच माहिती पोलिसांना प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकून जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले. तसेच संबंधित व्यक्तींविरुद्ध कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.




गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याने कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे पोलिसांसमोर आव्हान असते. या पार्श्वभूमीवर अवैध दारू विक्री, मटका, जुगार तसेच इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी खेड पोलिसांकडून विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. एकाच दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आलेल्या कारवायांमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे.

गणेशोत्सव शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा, यासाठी पोलिसांकडून संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत आहे. अवैध धंद्यांबाबत नागरिकांकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे तपास करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जात आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनीही अवैध दारू विक्री, मटका किंवा जुगारासारखे प्रकार निदर्शनास आल्यास पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी अवैध दारू विक्री आणि मटका-जुगाराविरोधातील कारवाई यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू ठेवण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. कोणत्याही भागात अवैध धंदे सुरू असल्याची माहिती मिळाल्यास त्याची तातडीने दखल घेऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. गणेशोत्सव काळात शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षितता राखण्यासाठी पोलिसांची गस्त व कारवाई सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# ‘आली गौराई सोनपावलांनी...’; पुण्यात गौराईंच्या स्वागताची लगबग!

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणरायाच्या आगमनाने घरोघरी रंगलेले चैतन्य आता गौराईंच्या आगमनाने आणखी द्विगुणित होणार आहे. ‘आली गौराई सोनपावलांनी...’ म्हणत पुण्यात गुरुवारी (दि. १७) अनुराधा नक्षत्रावर महिला-युवतींकडून गौराईंचे उत्साहात स्वागत केले जाणार आहे. गौरींच्या आगमनाने घरात सुख, समृद्धी आणि मांगल्य नांदते, अशी श्रद्धा असल्याने त्यांच्या स्वागतासाठी शहरातील घराघरांत जय्यत तयारी करण्यात आली आहे.**

गौरी आवाहनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारीच पुण्यातील अनेक घरांमध्ये स्वच्छता, सजावट आणि पूजेच्या तयारीला वेग आला होता. घरातील प्रत्येक कोपरा स्वच्छ करून आकर्षक पद्धतीने सजविण्यासाठी महिलांसह कुटुंबातील सदस्यांची लगबग सुरू होती. गौरींच्या आगमनासाठी आकर्षक मखर उभारण्याबरोबरच फुलांची मनमोहक आरास, विविध प्रकारची तोरणे, रंगीबेरंगी रांगोळी आणि विद्युत रोषणाईने घराला सजविण्याची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. गौरींचे आगमन अधिक देखणे आणि मंगलमय करण्यासाठी विविध प्रकारच्या सजावटीच्या साहित्याची खरेदी करण्यात आली आहे.

गौरींच्या स्वागतासाठी आवश्यक पूजेचे साहित्य, फुले, हार, नैवेद्यासाठी लागणारे पदार्थ तसेच विविध प्रकारच्या फराळाची आणि गोडधोड पदार्थांची तयारीही अनेक घरांमध्ये सुरू झाली आहे. गौरीपूजनाच्या दिवशी महिलांना वाण देण्याची परंपरा असल्याने त्यासाठी आवश्यक वस्तूंची खरेदी करण्यासाठी बाजारपेठांमध्येही गर्दी वाढली आहे. कुटुंबातील प्रथा आणि परंपरेनुसार गौरींच्या स्वागताची तयारी केली जात असून, प्रत्येक घरात आपल्या पद्धतीने गौरींचे आगमन व्हावे यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.



गुरुवारी (दि. १७) अनुराधा नक्षत्रावर सायंकाळी ७ वाजून ५२ मिनिटांपर्यंत गौरी आवाहन करता येणार आहे. त्यामुळे या कालावधीत आपापल्या कुटुंबातील प्रथा, परंपरा आणि धार्मिक पद्धतीनुसार गौरींचे आवाहन करून त्यांची स्थापना केली जाणार आहे. गौरींच्या आगमनाने गणेशोत्सवातील उत्साहाला आणखी रंगत येणार असून, घराघरांत भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

पुण्यातील विविध कुटुंबांमध्ये गौरींच्या स्वरूपातही मोठे वैविध्य पाहायला मिळते. काही घरांमध्ये खड्यांच्या गौरींची स्थापना केली जाते, तर काही ठिकाणी मुखवट्यांच्या गौरी बसविल्या जातात. काही कुटुंबांमध्ये पारंपरिक पद्धतीने उभ्या गौरींची स्थापना करण्याची प्रथा आहे. त्यामुळे गौरींचे स्वरूप, सजावट आणि पूजेच्या पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी प्रत्येक घरात या उत्सवाबद्दल असलेली श्रद्धा आणि उत्साह मात्र सारखाच पाहायला मिळतो.

शुक्रवारी (दि. १८) गौरीपूजनाचा मंगल सोहळा रंगणार आहे. गौरींचे आवाहन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच घरांमध्ये पूजेची लगबग सुरू होईल. कुटुंबातील प्रथा-परंपरेनुसार गौरींचे विधिवत पूजन करून त्यांना विविध प्रकारच्या पदार्थांचा नैवेद्य दाखविला जाणार आहे. अनेक घरांमध्ये या निमित्ताने पुरणपोळी, विविध भाज्या, गोड पदार्थ, फराळाचे पदार्थ आणि पारंपरिक खाद्यपदार्थांचा नैवेद्य तयार केला जाणार आहे.

गौरीपूजनाच्या निमित्ताने महिलांमध्येही विशेष उत्साह दिसून येत आहे. अनेक घरांमध्ये हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असून, सुवासिनींना आमंत्रित करून त्यांना वाण देण्याची तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे गौरीपूजन हा केवळ धार्मिक विधी न राहता महिलांच्या भेटीगाठी, आपुलकी आणि पारंपरिक संस्कृती जपण्याचा महत्त्वाचा सोहळा ठरणार आहे. घरातील ज्येष्ठ महिलांकडून पुढील पिढीला गौरीपूजनाच्या परंपरा आणि रीतिरिवाजांची माहिती देण्याचे चित्रही अनेक ठिकाणी पाहायला मिळणार आहे.

दरम्यान, गौरींच्या स्वागतासाठी बाजारपेठांमध्येही विविध प्रकारची फुले, सजावटीचे साहित्य, पूजेचे साहित्य, मखर आणि वाणाच्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. आकर्षक सजावटीपासून पारंपरिक पद्धतीच्या पूजेपर्यंत प्रत्येक कुटुंबाकडून आपल्या परीने गौरींच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

शनिवारी (दि. १९) गौरी आणि श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन केले जाणार आहे. त्यामुळे गुरुवारपासून सुरू होणारा गौरींच्या आगमनाचा उत्सव शुक्रवारच्या पूजनानंतर शनिवारी विसर्जनाने पूर्ण होणार आहे. गौरींच्या आगमनापासून पूजन आणि विसर्जनापर्यंत पुढील तीन दिवस पुण्यातील घराघरांत भक्ती, उत्साह, आनंद आणि मंगलमय वातावरण अनुभवायला मिळणार आहे.